आर्थिक गुन्हे शाखा
पोलीस अधीक्षक कार्यालय,
मल्हार पेठ, सातारा - ४१५००१
दुरध्वनी क्र. ०२१६२ - २३३८३३



-: वृत्त पत्र :-

<u>फरारी आरोपीस अटक केल्याबाबत</u>

शिवांजली ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादीत, नाडे नवारस्ता, ता. पाटण, जि. सातारा या पतसंस्थेत अपहार झाल्याबाबत दि.२३/०५/२०२२ रोजी मल्हारपेठ पोलीस ठाणे येथे गु.नों.क्र.६९/२०२२, कलम ४२०, ४०६, ४०९, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ भा.दं.सं. सह कलम ३ व ४ महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ प्रमाणे एकुण १४ आरोपींवर गुन्हा दाखल झाला होता. सदर गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखा, पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा या शाखेकडे देण्यात आला होता.

सदर गुन्ह्यातील आरोपी जयंत नारायण देवकर, वय ५६ वर्षे, रा. नाडे नवारस्ता, ता. पाटण, जि. सातारा हा गुन्हा दाखल झाल्यापासुन फरार झाला होता. तो फरारी असल्याची दखल घेऊन मा. न्यायालयानेही त्याचे पकड वॉरंट जारी केले होते. तो शिवांजली ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादीत या संस्थेचा चेअरमन होता.

दि.१९/०२/२०२६ रोजी आर्थिक गुन्हे शाखेस मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार वरील आरोपी जयंत नारायण देवकर, वय ६१ वर्षे यांस गायकवाड वाडी, हेळगाव पाडळी शेजारी, ता. कराड, जि. सातारा येथील शेतातील येथे एका खोलीतुन ताब्यात घेऊन, त्यास सदर गुन्ह्यांत अटक केली.

आज दि.२०/०२/२०२६ रोजी अटक आरोपी जयंत नारायण देवकर, वय ५६ वर्षे कराड येथील मा. न्यायालयात हजर केले असता, त्यास दि.२५/०२/२०२६ रोजी पर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

सदर गुन्ह्याचा तपास श्री हेमंतकुमार शहा, पोलीस निरीक्षक हे करीत आहेत.

वरील कामगिरीत पोलीस निरीक्षक हेमंतकुमार शहा, पोलीस उपनिरीक्षक रऊफ इनामदार, सपोफौ. इसाक मुलाणी, सपोफौ. विकास इंगवले, मपोह. वैशाली गुरव, पोह. संजय मोरे, मपोशि. अर्चना जाधव यांनी सहभाग घेतला.

सातारा जिल्ह्यामध्ये अनेक आर्थिक संस्थांकडुन विहीत दरापेक्षा जास्त व्याजाचे आमिष दाखवुन फसवणूक झाल्याच्या घटना घडल्या आहेत. अशा फसवणूकांमध्ये गुंतवणूकदारांची तसेच ठेवीदारांची कराडो रुपयांची फसवणूक झाली आहे. त्यामुळे आर्थिक गुन्हे शाखेकडुन असे आवाहन करण्यात येते की, गुंतवणूकीदार व ठेवीदारांनी वाजवी दरापेक्षा जास्त आमिष दाखविणा-या संस्थेत किंवा योजनेत तसेच कमी कालावधीत दामदुप्पट योजना, शेअर मार्केट मधून अवाजवी परतावा, क्रिप्टो करन्सी ट्रेडींग तसेच गुंतवणूकीव्दारे अवाजवी परतावा वगैरे योजनांमध्ये आर्थिक गुंतवणूक करु नये.

---